**महाराष्ट्र विधानसभा**
**पहिले अधिवेशन, २०२३**

-------------------------------

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**शुक्रवार, दिनांक २४ मार्च, २०२३ / चैत्र ३, १९४५ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) ग्रामविकास व पंचायत राज, वैद्यकीय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** | |
| **(३) कामगार मंत्री** | |
| **(४) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** | |
| **(५) पर्यटन, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री महिला व बालविकास मंत्री** | |

-------------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - २४**

-------------------------------------

**माथाडी कामगारांच्या मागण्यासंदर्भात**

**(१) * ६१२३७ श्री.छगन भुजबळ (येवला), श्री. अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शेखर निकम (चिपळूण), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या कामगार, गृह, पणन, सहकार, नगरविकास व महसूल विभागाअंतर्गत प्रलंबित असलेल्या प्रश्नांसाठी माथाडी कामगारांनी दिनांक १ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास एक दिवसाचा लाक्षणिक संप पुकारला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माथाडी कामगारांनी पुकारलेल्या राज्यव्यापी संपात नाशिक जिल्ह्यातील पाच हजार माथाडी कामगार सहभागी झाल्याने १७ बाजार समित्यांचे कामकाज ठप्प झाल्याने कोटयवधी रुपयांची उलाढालही ठप्प झाली असल्याची बाब माहे जानेवारी २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाकडे प्रलंबित असलेल्या प्रश्नांची निवेदने वेळोवेळी मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, संबंधित विभागाचे मंत्री व प्रधान सचिव तसेच कामगार आयुक्तांना देऊनही त्यावर काहीच कार्यवाही न झाल्याने माथाडी कामगार संघटनांमध्ये निराशा निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, माथाडी सल्लागार समितीची पुनर्रचना, त्यामध्ये युनियनच्या सभासदांच्या नेमणूका, माथाडी कामगारांच्या मुलांना प्राधान्य देणे, समितीच्या अनुज्ञाप्तीधारक माथाडी / तोलणार कामगारांना समितीच्या कार्यालयीन सेवेत घेणे, सिडको मार्फत माथाडी कामगारांना नवी मुंबई परिसरात घरे मिळणे अशा प्रमुख मागण्या केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरच्या मागण्यांवर अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२३ पूर्वी कार्यवाही न झाल्यास माथाडी कामगारांनी पुन्हा लाक्षणिक संपावर जाण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तदअनुषंगाने माथाडी कामगारांच्या उक्त मागण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात आहे,
(७) नसल्यास, विलंबांची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाशिक जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाच्या कार्यक्षेत्रात दि.१ फेब्रुवारी,२०२३ रोजीच्या संपात माथाडी/मापारी कामगार सहभागी झाल्याने मंडळाच्या कार्यक्षेत्रातील ११ बाजार समित्या व त्यांच्या उपबाजार समित्यांमधील संपुर्ण कामकाज बंद होते. त्यामुळे शेतमाल खरेदी विक्रीवर त्याचा परीणाम झाला होता, हे खरे आहे.
(३),(४),(५) व (६) माथाडी मंडळांमधील कामगारांच्या समस्या सोडविण्याच्या अनुषंगाने संघटनांनी विविध मागण्या शासन स्तरावर तसेच कामगार आयुक्तांकडे केलेल्या आहेत, हे खरे आहे.

उपरोक्त मागण्या तसेच प्रलंबित प्रश्नांच्या अनुषंगाने शासन स्तरावर व कामगार आयुक्तांच्या स्तरावर संघटनांच्या प्रतिनिधींसमवेत वेळोवेळी बैठका घेऊन चर्चा करण्यात आलेली आहे. तसेच त्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे. कामगार संघटनांमध्ये निराशा निर्माण होऊ नये याबाबत शासन व कामगार आयुक्तांच्या स्तरावर प्रयत्न करण्यात येत आहेत.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील निराधार, परित्यक्त्या, विधवा, देवदासी महिलांसाठी स्वतंत्र विकास महामंडळ स्थापन करण्याबाबत

**(२) *६३५३६ श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील निराधार, परित्यक्त्या, विधवा, देवदासी महिलांच्या मागण्यांबाबत महाराष्ट्र निराधार व देवदासी महिला संघटनामार्फत आंदोलने, मेळावे, धरणे इ.माध्यमातून शासनास अनेकदा निवेदन देवूनही कोणतीही कार्यवाही होत नसल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागण्यांमध्ये निराधार, परित्यक्त्या, विधवा, देवदासी महिलांसाठी स्वतंत्र विकास महामंडळ स्थापना करणे, राज्यातील देवदासींचे सर्व्हेक्षण करण्याची जबाबदारी सामाजिक संस्थेकडे देणे, संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत १५ वर्षाच्या वास्तव्याची अट रद्द करुन एक वर्षाची करणे, वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रक्कम रु. १,५०, ०००/- करणे, विधवा महिलांना अनुदान मिळणे इत्यादी मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या होत्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आयुक्त, महिला व बालविकास विभाग यांनी निराधार, परित्यक्त्या, विधवा, देवदासी महिलांसाठी स्वतंत्र विकास महामंडळ स्थापन करणे व त्यांच्या मागण्यासंदर्भात महिला व बाल विकास विभागाकडे दिनांक २४ जून, २०२२ रोजीच्या पत्रान्वये शासनास कळविण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निराधार, परित्यक्त्या, विधवा, देवदासी महिलांसाठी स्वतंत्र विकास महामंडळ स्थापन करण्यासह त्यांच्या इतर मागण्या मान्य करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा :** (१) नाही.

(२) निराधार, परित्यक्त्या, विधवा महिलांसाठी राज्यगृह, आधारगृहे, संरक्षण गृहे, स्वाधारगृह कार्यरत असून पिडीत महिलांना सदर गृहांमध्ये प्रवेश दिला जातो. प्रवेक्षितांस अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य इ. सुविधा पुरविल्या जातात.

महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय दि.२७.०८.२०२१ अन्वये "मिशन वात्सल्य" या योजनेंतर्गत एकल/ विधवा महिला आणि अनाथ बालके यांना शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ उपलब्ध करुन देण्यात येतो. सदर योजनेंतर्गत संजय गांधी निराधार योजना, राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना, श्रावण बाळ योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना, मालमत्ता विषयक हक्क, शिधापत्रिका, वारस प्रमाणपत्र इ. बाबत सहकार्य करण्यात येते.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत, निराधार विधवा लाभार्थ्यांना अर्थसहाय्य देण्यात येते. तसेच, शासन निर्णय दि.०३.०५.२०२१ अन्वये सदर योजनेच्या लाभासाठी किमान १५ वर्षापासून राज्याचा रहिवाशी असणे आवश्यक आहे. तथापि, विधवा महिलांकरीता (इतर राज्यातून लग्न होऊन आलेल्या) किमान १५ वर्ष महाराष्ट्र राज्यात रहिवासी असल्याची अट शिथील करण्यात आली आहे. परंतु, सदर महिलेचा पती हा किमान १५ वर्ष महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे.

(३) होय,

(४) महाराष्ट्र राज्याच्या चौथ्या प्रस्तावित महिला धोरणामध्ये समाजातील निराधार, परित्यक्त्या, विधवा, देवदासी महिलांसाठी विविध उपाययोजनांचा समावेश करण्यात आला असल्याने स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्याची आवश्यकता दिसून येत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मनोर (जि.पालघर) येथील ग्रामीण रुग्णालयात रुग्णावर योग्य व वेळेवर उपचार न मिळाल्याने झालेला मृत्यू

**(३) * ६४१७२ श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनोर (जि.पालघर) येथील ग्रामीण रुग्णालयात आदिवासी गरोदर महिलेवर उपचारासाठी सहा तासांपेक्षा अधिक वेळ लागल्याने तसेच सिझेरियन प्रसूती शस्त्रक्रिया करण्यासाठी डॉक्टर उपलब्ध नसल्याने सदर महिलेस प्रसूती शस्त्रक्रिया करण्यासाठी सिल्वासा येथे रुग्णालयात नेत असताना तिचा बाळासह मृत्यू झाला असल्याचे दिनांक १२ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार रुग्णांवर योग्य व वेळेवर उपचार न देण्याऱ्या संबंधित डॉक्टर व अधिकारी यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर गरोदर महिला दि.१०.०२.२०२३ रोजी सकाळी प्रसूतीसाठी ग्रामीण रुग्णालय, मनोर येथे दाखल झाली. कर्तव्यावरील वैद्यकीय अधिकारी व अधिपरिचारिका यांनी तपासणी केली असता त्यांची स्थिती स्थिर होती.

सदर रुग्णालयात आयपीएचएस अंतर्गत भूलतज्ञ व स्त्रीरोग तज्ञ यांच्या सेवा उपलब्ध करुन देण्यात येतात. तथापि, सदर माता अति जोखमीची माता असल्याने व त्या दिवशी आवश्यक तज्ञांची उपलब्धता नसल्याने संदर्भीत करण्याची आवश्यकता आहे असा वैद्यकीय सल्ला रुग्णाच्या नातेवाईकास देण्यात आला. परंतु रुग्णाच्या नातेवाईकांनी वैद्यकीय सल्ला न ऐकता स्वाभाविक प्रसुतिचा आग्रह धरला. त्यामध्ये काही वेळ गेला. त्यानंतर रुग्णाचे नातेवाईक रुग्णास नजीकच्या खाजगी रुग्णालयात घेऊन गेले व त्या खाजगी रुग्णालयाने सायंकाळी ७ वाजता सदर रुग्णास सेल्वासा येथे संदर्भीत केले. सेल्वासा येथे शासकीय दवाखान्यातील वैद्यकीय अधिकारी यांनी रात्री ९.३० च्या सुमारास सदर महिलेस मृत घोषित केले.
(२) व (३) होय, सदर घटनेचे गांभिर्य लक्षात घेऊन सदर प्रकरणी प्राथमिक चौकशी करण्यात आली असून त्यानुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाघेरे (ता.इगतपूरी, जि.नाशिक) येथील १४ गाव पाणीपुरवठा योजनेच्या एकाच कामावर दुहेरी निधीचा वापर होत असल्याबाबत

**(४) * ६००४१ श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाघेरे (ता.इगतपूरी, जि.नाशिक) येथील १४ गाव पाणीपुरवठा योजनेला महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने २८ कोटी १८ लाख रुपयांचा निधी देऊन सुरु केलेल्या कामावर जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभाग त्याच योजनेवर पुन्हा चार कोटी खर्च करणार असल्याचे माहे जानेवारी,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,सदर काम करतांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची परवानगी न घेताच जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने १४ गाव पाणीपुरवठा योजनेतील गोधडयाचा पाडा व अन्य दोन वाडयांसाठी १ कोटी ९० लाख ६५ हजार तसेच वाघेरा व तीन वाडयांसाठी १ कोटी ९५ लाख १६ हजार किंमतीच्या कामांना प्रशासकीय मान्यता दिल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,सदर कामाबाबत ग्रामपंचायतींनी मुख्य कार्यकारी अधिकारी,नाशिक यांचेकडे लेखी तक्रार दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) व (२) वाघेरे व १४ गावे या प्रादेशिक पाणी पुरवठ योजनेस दि.२४.०१.२०२२ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असून सदर योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात येत आहे. गोधड्याचा पाडा व २ वाड्या तसेच वाघेरा व ३ वाड्या या नळ पाणी पुरवठा योजनेस जिल्हा परिषदेमार्फत दि.१२.१२.२०२२ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तथापि, सदर दोन्ही पाणी पुरवठा योजनांचा समावेश वाघेरे व १४ गावाच्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेत असल्याने उक्त दोन्ही पाणी पुरवठा योजनांची प्रशासकीय मान्यता रद्द करण्यात आली आहे, हे खरे आहे.
(३) ग्रामपंचायत वाघेरा यांनी ठरावाद्वारे प्रादेशिक योजनेमधुन पाणी पुरवठा करणेबाबत कळविलेले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत उपचाराच्या आर्थिक मर्यादेत वाढ करणेबाबत

**(५) * ६३८७७ श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांवर मोफत उपचारासाठी सुरु केलेल्या महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेत कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीसाठी दीड लाखापर्यत मोफत उपचाराची आर्थिक मर्यादा निश्चित करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत कोणत्याही आजारावर उपचार घेताना येणारा खर्च लक्षात घेता दीड लाखाच्या मर्यादेत हे वैद्यकीय उपचार होणे शक्य नसल्यामुळे उर्वरित आर्थिक भार हा रुग्णाच्या कुटुंबियांना स्वत: सहन करावा लागतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एकीकडे उपचाराची आर्थिक मर्यादा दीड लाख असतानाही गत १० वर्षात इन्शुरन्स कंपन्यांच्या प्रिमीयममध्ये मात्र २४० टक्क्यांनी वाढ झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रिमीयम वाढीमुळे इन्शुरन्स कंपन्यांना लाभ होतो मात्र आर्थिक मर्यादा तीच राहिल्यामुळे रुग्णांना मात्र हा लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपचाराकरिता लागणारा वाढता खर्च पाहता आर्थिक दुर्बल घटकांतील रुग्णांच्या उपचाराकरीता महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत उपचाराच्या आर्थिक मर्यादेत वाढ करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय, महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या लाभार्थ्यांना प्रति कुटुंब प्रति वर्ष रु.१.५ लक्ष मर्यादेत उपचार अनुज्ञेय आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या लाभार्थ्यांना प्रति कुटुंब प्रति वर्ष रु.१.५ लक्ष मर्यादेत उपचार अनुज्ञेय आहेत तसेच लाभार्थी आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत पात्र असल्यास प्रति कुटुंब प्रति वर्ष रु. ५ लक्ष रकमेपर्यंतचे उपचार अनुज्ञेय आहेत. त्याशिवाय जे उपचार मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीमध्ये समाविष्ट आहेत त्याकरिता सदर निधीमधून सहाय्य दिले जाते. तथापि सदर तिन्ही योजनांस पात्र न ठरल्यास रुग्णास स्वत: आर्थिक भार सहन करावा लागतो.

(३) हे अंशत: खरे आहे.

सन २०११ मध्ये महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत रु.१.५ लक्ष रकमेपर्यंतचे विमा संरक्षण पुरविण्यासाठी निविदा प्रक्रियेव्दारे प्रति कुटुंब प्रति वर्ष रु.३३३/- इतका विमा हप्ता दर प्राप्त झाला होता. सदर विमा कंपनीकडून राबविण्यात आलेल्या योजनेमध्ये उपचारांची संख्या ९७१ व अंगीकृत रुग्णालयांची संख्या ४९२ इतकी होती.

सन २०१९ मध्ये एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेतील अंगीकृत रुग्णालयांची संख्या (४९२ ऐवजी १०००) व उपचारांची संख्या (९७१ ऐवजी ९९६- यामध्ये काही नवीन उपचारांचा समावेश व दरात अंशत: बदल) व यासह अन्य तांत्रिक व प्रशासकीय बाबींमध्ये सुधारणा करण्यात आल्या. सदर सुधारणांसह रु.१.५ लक्ष रकमेपर्यंतचे विमा संरक्षण पुरविण्यासाठी विमा कंपनीची निवड करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. त्यामुळे सदर घटक विचारात घेऊन निविदा प्रक्रियेअंती प्रति कुटुंब प्रति वर्ष रु.७९७/- इतका लघुत्तम विमा हप्ता दर प्राप्त झाला.

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोय योजनेच्या सन २०१२ मधील प्रति कुटुंब प्रति वर्ष रु.३३३/- या विमा हप्ता दरामध्ये मागील १० वर्षात रु.४६४/- ने वाढ झाली असून सदर वाढ ही मुळ रु.३३३/- दराच्या १३९ टक्के इतकी आहे.

(४) हे खरे नाही.

सन २०१२ मध्ये सुरु करण्यात आलेल्या योजनेत सन २०२० मध्ये सुधारणा केल्याने विमा कंपनीच्या विमा हप्ता दरामध्ये वाढ झाली आहे. मात्र लाभार्थ्यांच्या दाव्यापोटी विशिष्ट सुत्रानुसार रक्कम अदा न झाल्यास विमा हप्त्यातील रकमेतील उर्वरीत रकमेचा १००% परतावा देण्याची विमा कंपनीसोबत झालेल्या करारनाम्यात तरतूद आहे.

सन २०२० ते सन २०२२ या वर्षात विमा कंपनीस प्रदान करण्यात आलेल्या विमा हप्ता रक्कम व लाभार्थ्यांच्या उपचारापोटी प्रदान करण्यात आलेल्या दावा खर्चाचे गुणोत्तर पुढीलप्रमाणे आहे.

सन २०२० - ८५.०४%

सन २०२१ - १०७.१०%

सन २०२२ - ९७.८४%

सन २०२० मध्ये विमा कंपनीकडून कमी करण्यात आलेल्या खर्चास अनुसरुन करारनाम्यातील निश्चित सुत्राच्या आधारे रु. २६४.४०/- कोटी रकमेचा परतावा राज्य आरोग्य हमी सोसायटीस प्राप्त झाला आहे.

(५) महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत विद्यमान स्थितीत प्रति कुटुंब प्रति वर्ष ₹१.५ लक्ष रकमेपर्यंत मिळणारे विमा संरक्षण वाढविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्हा परिषद राबवीत असलेल्या जलजीवन मिशन योजनेच्या कामांत झालेला गैरव्यवहार

**(६) *५७५५८ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे, जिल्हा परिषद राबवीत असलेल्या जलजीवन मिशन योजनेच्या कामांमध्ये माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कामांमधील गैरव्यवहारासोबतच राज्य शासनाने प्रसिद्ध केलेल्या अहवालात जलजीवनच्या कामांना पुणे जिल्हयामधून कमी प्रमाणात कार्यादेश देण्यात येत असल्याचे ही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, पुणे जिल्हा परिषदेच्या जलजीवन मिशन मधील नळपाणीपुरवठा योजनेची कामे मिळविताना ठेकदाराकडून निविदा रक्कमेत वाढ करुन कोटयावधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रश्नी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाड औद्योगिक वसाहतीमधील मल्लक या कारखान्यात झालेला स्फोट

**(७)** * **६२६७४ श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड औद्योगिक वसाहतीमधील मल्लक या कारखान्यात दिनांक ८ फेब्रुवारी,२०२३ रोजी वा त्यासुमारास स्फोट होऊन भीषण आग लागली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू आगीत जीवित व वित्तहानी झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर दुर्घटनेची शासनाने चौकशी करुन त्यात मृत पावलेल्या कामगारांच्या नातेवाईकांना व जखमींना अर्थसहाय्य देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) मे. मल्लक स्पेशालिटी प्रा. लि., प्लॉट नं.सी-१०३, एमआयडीसी महाड, ता. महाड, जि.रायगड या कारखान्यात दि.०८.०२.२०२३ रोजी इथिलिन ऑक्साईड / प्रोपॅलीन ऑक्साईड प्लान्टच्या रिॲक्टरमध्ये दाब वाढल्यामुळे प्लान्टमधील रसायनांची गळती झाली व त्यामुळे आग लागून त्या प्लान्टमधल्या रिॲक्टरचा स्फोट झाला आहे.

(२) सदर आगीच्या दुर्घटनेत जीवितहानी झालेली नाही. तथापि, सदर कारखान्यातील ४ व शेजारच्या ३ कारखान्यांमधील ९ कामगारांना किरकोळ जखमा झाल्या होत्या. सदर जखमी कामगारांना वैद्यकीय उपचारानंतर त्याचदिवशी घरी सोडण्यात आले आहे.

सदर आगीच्या दुर्घटनेमुळे कारखान्यातील अंदाजे २९ कोटी आणि शेजारील ३ कारखान्यांतील एकूण अंदाजे रु.३७ लाख रुपयांच्या मालमत्तेचे नुकसान झाले आहे. तसेच, कारखान्याजवळील टेमघर गावात काही प्रमाणात हादरे बसल्याने गावातील ४ घरांचे, ८ वर्कशॉपचे आणि जिल्हा परिषद शाळा व अंगणवाडी यांचे नुकसान झाले असल्याचे कारखाना व्यवस्थापनाने कळविले आहे. त्यानुसार, तहसिलदार, महाड यांनी दि.१६.०२.२०२३ रोजीच्या पत्रांन्वये झालेल्या नुकसानीबाबत आर्थिक मदत देण्यासाठी मल्लक कारखाना व्यवस्थापनास कळविले होते. त्यास अनुसार, कारखाना व्यवस्थापनामार्फत नुकसान भरपाई म्हणून रु.३,९४,९००/- इतकी रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

(३) सदर कारखान्यातील आगीच्या दुर्घटनेची चौकशी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत करण्यात आली आहे. चौकशीदरम्यान घटनेच्या दिवशी कारखान्यात सुरक्षित कामाची पद्धत न अवलंबल्याचे तसेच कारखान्याच्या उत्पादन प्रक्रियेजवळ मोठया प्रमाणात ज्वलनशील रसायनांचा साठा केला असल्याचे आढळून आले आहे.

सदर आगीच्या दुर्घटनेत कोणताही कामगार मृत झालेला नाही. तसेच, कारखाना व्यवस्थापनामार्फत सर्व जखमी कामगारांच्या वैद्यकीय उपचाराचा खर्च करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात क्षयग्रस्त महिलांसाठी स्वतंत्र विभाग सुरु करण्याबाबत

**(८)** * **६०९३१ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात क्षयरोग विभागात प्रतिदिन २०० पेक्षा जास्त रुग्ण येत असून यातील १० टक्के रुग्ण क्षयग्रस्त असून तेथे क्षयग्रस्त महिलांसाठी स्वतंत्र विभाग (वॉर्ड) नसल्यामुळे त्यांना उपचारासाठी अन्य ठिकाणी जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन उक्त रुग्णालयात क्षयग्रस्त महिलांसाठी स्वतंत्र विभाग तसेच चांगल्या आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) व (२) नाही.

सद्यस्थितीत क्षयरोग ग्रस्त महिलांकरीता स्वतंत्र वॉर्ड कार्यान्वित केलेला असून सदर वॉर्ड मध्येच त्यांचावर उपचार केले जातात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मालवणी मालाड (मुंबई) येथे सर्व सुविधायुक्त मल्टीस्पेशालिटी रुग्णालय सुरु करणेबाबत**

**(९) * ६३२६९ श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालवणी मालाड (मुंबई) येथील जनकल्याण नगर येथे ६० खाटांचे शासकीय रुग्णालयाचे उद्‌घाटन दिनांक २० ऑगस्ट, २०११ रोजी वा त्यासुमारास करण्यात येऊन सद्यस्थितीत १८८० चौ.मीटर जागेवर या रुग्णालयाची दोन मजली इमारत बांधण्यात आली असून त्यात केवळ प्रसूतिगृह, डायलेसिस सेंटर (एकूण ५ खाटा) नवजात शिशुचे टीकाकरण व प्राथमिक उपचार सुरु आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पश्चिम उपनगरातील या भागात कोणतेही मोठे सर्व सुविधायुक्त शासकीय रुग्णालय नसल्यामुळे रुग्णांना उपचारार्थ के. ई. एम., सायन, नायर या रुग्णालयात जावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रुग्णालयाच्या जागेचे एकूण क्षेत्रफळ अंदाजे सव्वा पाच एकर इतके असून या जागेवर अतिदक्षता विभाग, नवजात शिशू विशेष काळजी कक्ष, जळीत रुग्ण कक्ष, डायलेसिस केंद्राचे श्रेणीवर्धन, आयुष सुविधा कक्ष, हृदयविकार उपचार केंद्र, मृतदेह ठेवण्यासाठी शीतगृह, कर्करोग केमोथेरपी उपचार केंद्र, नाक, कान, घसा, दंत व अस्थिभंग उपचार विभाग तसेच शासकीय आरोग्य धोरणानुसार प्रमाणपत्र केंद्र अशा आधुनिक तंत्रज्ञानयुक्त मल्टीस्पेशालिटी रुग्णालय उभारण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) अंशत: खरे आहे.

मालावणी मालाड, मुंबई येथील ६० खाटांचे रुग्णालयामार्फत प्रसूतिगृह, डायलेसिस सेंटर (एकूण ५ खाटा) नवजात शिशुचे टीकाकरण व प्राथमिक उपचार तसेच अपघात विभाग सेवा, शस्त्रिक्रिया, दंत चिकित्साश सेवा, क्ष-किरण व प्रयोगशाळा सेवा, रुग्णंवाहिका सेवा, इ. सेवा पुरविण्याात येत आहेत.
(२) अंशत: खरे आहे.
सामान्य रुग्णालय,मालवणी मालाड, मुंबई येथे ६० खाटांचे रुग्णाललयामध्ये आवश्य.क असलेल्याथ सेवांद्वारे रुग्णांवर उपचार करण्यात येतो. परंतु ज्या रुग्णांस संदर्भ सेवेची आवश्यकता असते, त्यांनाच पुढील उपचारासाठी संदर्भीत केले जाते.
(३) अंशत: खरे आहे.

(४) सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारित नवीन रुग्णालय सुरु करणे व कार्यान्वित रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करणे यासाठी जोडबृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही आरोग्य सेवा आयुक्तालयास्तरावरुन सुरु असून सामान्य रुग्णालय, मालवणी- मालाड चे श्रेणीवर्धन करण्याची मागणी निकषानुसार जोडबृहत आराखड्यामध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेची कामे संथगंतीने सुरु असल्याबाबत**

**(१०) * ६३७३१ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील २५३ गावांमधील पिण्याच्या पाणीपुरवठयाची शासनस्तरावरील कामे अत्यंत संथ गतीने सुरु आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास मौजे शिंदेवाडी व ससेवाडी (ता.भोर,जि.पुणे) या गावांसाठी प्रादेशिक पाणी पुरवठा योजना जिल्हा परिषदेकडून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे वर्ग करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, मौजे वरोडी बु, वरोडी खु. व वरोडी डायमुख या तीन गावांत उन्हाळयामध्ये पाण्याची तिव्र समस्या निर्माण होत असल्यामुळे या तीन गावांत प्रादेशिक पाणी पुरवठा योजना करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे यांना दिनांक २३ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वेळू गावातील वाढत्या लोकसंख्येमुळे अस्तित्वातील पाणी पुरवठा योजना अपुरी पडत असल्याने वेळू गावचा समावेश प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेमध्ये करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २८ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास कार्यकारी अभियंता, ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजना, जिल्हा परिषद, पुणे यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) हे खरे आहे.
(४) हे खरे आहे.
(५) शिंदेवाडी, ससेवाडी साळवडे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेस व वरोडी प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेस दि. २१.११.२०२२ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. दोन्ही योजनांचे कार्यादेश संबंधित ठेकेदारास देण्यात आले आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर शहरातील डॉ. चिद्दरवार रुग्णालयात गर्भवती महिलेचा बाळासह झालेला मृत्यू

**(११) * ६३७०२ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर शहरातील डॉ. चिद्दरवार रुग्णालयात प्रसूतीसाठी दाखल झालेल्या नऊ महिन्याच्या गर्भवती महिला श्रीमती मोनिका राजेश आयतवार यांचा बाळासह दिनांक ८ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास प्रसुतीकक्षातच मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महिलेवर रुग्णालयाकडून केलेल्या औषधोपचाराचा तपशिल व कागदपत्रे नातेवाईकांनी मागितली असता ती रुग्णालयाकडून नाकारण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर महिलेवर रुग्णालयाकडुन केलेल्या औषधोपचाराचा तपशिल व कागदपत्रे दिनांक ०९/०२/२३ रोजी पोलिसांना देण्यात आली होती. दिनांक १०/०२/२३ रोजी पोलीसांकडुन सदर कागदपत्रे परत मिळाल्यानंतर नातेवाईकांना घेऊन जाण्यास कळविले व दिनांक ११/०२/२३ रोजी सदरची कागदपत्रे नातेवाईकांना देण्यात आली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लांजा (जि.रत्नागिरी) तालुक्यात महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचा लाभ रुग्णांना विनाविलंब मिळण्याबाबत

**(१२) * ६३६११ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या लांजा (जि.रत्नागिरी) येथील एकाही रुग्णालयात महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना लागू नसल्यामुळे नागरिकांना या योजनेच्या लाभापासून वंचित रहावे लागत असून त्यांना अन्य ठिकाणी जाऊन उपचार घ्यावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तालुक्यातील रुग्णालयात महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना लागू करण्याची मागणी ग्रामस्थांनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री, मा.पालकमंत्री, रत्नागिरी व जिल्हा शल्यचिकित्सक, रत्नागिरी, जिल्हा यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) रत्नागिरी जिल्ह्यातील लांजा येथे महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत रुग्णालये अंगीकृत नाहीत, हे खरे आहे.

तथापि रत्नागिरी जिल्ह्यातील एकूण ९ तालुक्यांपैकी ४ तालुक्यांमध्ये १३ रुग्णालये अंगीकृत आहेत. सदर रुग्णालयांमध्ये उक्त योजनेंतर्गत पात्र नागरीक उपचार घेऊ शकतात.

(२) अंशत: खरे आहे.

डॉ. सुहास खानविलकर, श्री. स्वामी समर्थ जनरल हॉस्पीटल यांनी पालकमंत्री रत्नागिरी यांना निवेदन दिले आहे.

(३) शासन निर्णय दिनांक २६ फेब्रुवारी २०१९ च्या तरतुदीच्या अधीन राहून समन्वय, अंगीकरण व शिस्तपालन समितीद्वारे लांजा तालुक्यातील रुग्णालय एकत्रित महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजने अंतर्गत अंगीकृत करणेबाबत उचित निर्णय घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चेंबूर, मुंबई येथील बालगृहातून मुले गायब झाल्याबाबत

**(१३) * ५६५६१ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील चेंबूर येथील आदित्य बिर्ला सेंटर फॉर वेल्फेअर ऑफ चिल्ड्रेन या संस्थेच्या बालगृहातून दिनांक ९ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास दोन मुले गायब झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार संबधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर संस्थेतून दि. १७.१२.२०२२ ते २९.०१.२०२३ या कालावधीमध्ये १४ प्रवेशित मुले पळुन गेलेली आहेत.

(२) व (३) याबाबत चौकशी करण्यात आली असून बाल न्याय अधिनियमातील तरतुदींचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुषंगाने संबंधित संस्थेस कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली असून सदर संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र रद्द करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील महानगरपालिकेतील शाळांच्या इमारतीची झालेली दुरवस्था

**(१४) * ५७९७२ श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहराच्या हद्दवाढ भागात जिल्हा परिषदेच्या ३७ शाळांचे अद्याप हस्तांतरण न झाल्याने व महानगरपालिकेने शाळांच्या इमारतीच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष केल्याने शेकडो विद्यार्थ्यांना जीव मुठीत घेऊन शिक्षण घ्यावे लागत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषद आणि महानगरपालिकेच्या समन्वयाअभावी या शाळांमधील विद्यार्थ्यांना पुरेशा सुविधा मिळत नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हा परिषदेची मालमत्ता असणाऱ्या हद्दवाढ भागातील ३७ शाळांचे हस्तांतरणाच्या बदल्यात शाळा परिसरात गाळे व इतर वास्तू बांधून जिल्हा परिषदेला महानगरपालिकेकडून मोबदला देऊन जिल्हा परिषदेच्या सेस निधी वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, उक्त संपूर्ण प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. गिरीश महाजन :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) शासनाच्या प्रचलित धोरणानुसार जिल्हा परिषदेकडील शाळा मालमत्तेच्या मुल्यांकनाची रक्कम आकारुन तसेच संबंधित शिक्षकांच्या सहमतीनुसार त्यांच्या सेवा महानगर पालिकेकडे हस्तांतरीत करण्याची तरतुद आहे. तथापि, सदर शाळा हस्तांतरणाबाबत सर्वसाधारण सभेने मंजुरी दिलेली नसल्यामुळे हस्तांतरणाची कार्यवाही पुर्ण झालेली नाही.

-----------------

## पारनेरच्या हिवरे कोरडा (जि.अहमदनगर) येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकाने डमी शिक्षकाची नेमणूक केल्याबाबत

**(१५) * ५६५४८ श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पारनेरच्या हिवरे कोरडा (जि.अहमदनगर) येथील मांजरधाव प्राथमिक शाळेतील (जिल्हा परिषद शाळा) एका शिक्षकाने स्वत:च्या जागेवर डमी शिक्षकाची नेमणूक केल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तदअनुषंगाने सदरहू प्रकरणी संबंधीत दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, निलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, दोषींवर निलंबनाची कारवाई करण्यात आली असून चौकशी समिती गठीत करुन चौकशी करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नंदूरबार जिल्हयात शासकीय वापरासाठी असलेला औषधसाठा फेकून दिल्याबाबत

**(१६) * ६१५४५ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नंदुरबार जिल्हा हा राज्यातील सर्वाधिक कुपोषित तसेच बालमृत्यू प्रमाणही अधिक असलेला जिल्हा असून सुध्दा शासनाकडून आरोग्य यंत्रणेला उपलब्ध करुन दिलेला औषधसाठा नंदूरबार तालुक्यातील स्मशानभूमी लगतच्या शेतात न वापरता फेकून दिला असल्याचे दिनांक १० डिसेंबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे

(२) असल्यास, सदर औषधे ही मुदतबाहय झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार यांस जबाबदार असणा-या संबंधितांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा शल्य चिकित्सक, नंदूरबार यांनी जिल्हास्तरावर नेमलेल्या संयुक्त चौकशी समितीच्या तपासणीत विविध प्रकारची मुदतबाह्य औषधे फेकून दिली असल्याचे आढळून आले आहे. सदर चौकशी समितीचा अहवाल स्वयंस्पष्ट नसल्याने, सदर प्रकरणी सखोल चौकशी करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदूरबार यांनी दि. २०.०२.२०२३ रोजी चौकशी समिती पुनर्गठीत केली असून सदर समिती मार्फत चौकशी सुरु करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्हयातील तेंदू संकलन करणाऱ्या मजुरांना तातडीने बोनस मिळण्याबाबत

**(१७) * ६३८०० श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयात तेंदुपत्ता संकलन करणाऱ्या मजुरांना दरवर्षी बोनस दिला जातो परंतु पेसा अंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायतीच्या मजुरांना मागीलवर्षी बोनसची रक्कम दिली नसल्याचे माहे जानेवारी,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बोनसच्या प्रतिक्षेत असलेल्या मजुरांनी ग्रामपंचायतीकडे विचारणा केली असता शासनाकडून बोनसची रक्कम गावातील विकासकामांवर खर्च करण्याबाबतचे पत्र प्राप्त झाल्याचे मजुरांना दाखविण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे तेंदू संकलन मजुरांनी बोनसची रक्कम मिळावी अशी मागणी दिनांक ६ फेब्रुवारी,२०२३ रोजी वा त्यासुमारास जिल्हा परिषदेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी करुन मजुरांना तातडीने बोनस देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) सन २०१५-२०२१ पर्यंत गौण वनौउपजाद्वारे प्राप्त झालेली रक्कम हि ग्रामसभेमध्ये निर्णय घेऊन मजुरांना बोनस म्हणून वाटप करण्यात येत होती.मात्र त्याबाबत शासनाचे कोणतेही आदेश/शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला नाही.
(२) होय, हे खरे आहे. प्रचलित कायद्यातील तरतुदीस अनुसरून दिनांक २९ एप्रिल २०२२ रोजीच्या पत्रान्वये याबाबत स्वयंस्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत.
(३) होय,हे खरे आहे.

(४) महाराष्ट्र अनुसूचित क्षेत्रातील पंचायतींना स्वयंशासन करण्यासंबंधीचे अधिकार प्रदान करणे (राज्याच्या विवक्षित कायद्यांमध्ये सुधारणा) अधिनियम, १९९७ नुसार महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या "कलम ५७, पोट-कलम (२) खंड (फअ)" मध्ये नमुद केलेनुसार "पंचायतीच्या अधिकारितेत असलेल्या आणि त्या पंचायतीकडे निहित असलेल्या अनुसूचित क्षेत्रात गोळा केलेल्या गौण वनोत्पादनाच्या विक्रीचे उत्पन्न किंवा स्वामित्वधन "ग्रामनिधी" मध्ये जमा करण्यात येईल, अशी तरतूद केलेली आहे. तसेच गौण वनोत्पादानाच्या विक्रीचे "कलम ५७, पोट-कलम (२) खंड (फअ)" अन्वये, ग्रामनिधी मध्ये जमा केलेले उत्पन्न किंवा स्वामित्वधन केवळ उक्त अनुसूचित क्षेत्राच्या विकासासाठीच खर्च करण्यात येईल, अशी स्वयंस्पष्ट तरतूद असल्याने कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) निरंक

-----------------

## जळगाव जिल्ह्यात पाणीटंचाईवर मात करण्यासाठी जलजीवन मिशन योजने अंतर्गत कामांना गती देण्याबाबत

**(१८) * ६०६१८ श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यात पाणीटंचाईवर मात करण्यासाठी जलजीवन मिशनच्या १४०० पेक्षा जास्त योजना मंजूर असून अनेक योजना निविदा प्रक्रियेत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या ठेकेदारांना कामे दिली त्यांच्याकडून प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली नाही व काही योजनांसाठी तीन-चार वेळा निविदा प्रसिद्ध करूनही ठेकेदार मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तद्नुषंगाने उक्त जिल्ह्यातील जलजीवन योजनेला गती देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

ज्या ठेकेदारांकडून प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली नाही किंवा कामाची गती कमी होती अशा १७० कामांना नोटीस बजावण्यात आल्या आहेत. जळगाव जिल्ह्यात पाणी पुरवठा योजनांची कामे करणाऱ्या ठेकेदारांची संख्या कमी असल्याने निविदा प्रक्रिया ३-४ वा काही योजनांसाठी त्यापेक्षी जास्त वेळा प्रसिध्द करावी लागली.

(३) सदरील प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जिल्हास्तरावर कंत्राटदार यांची बैठक घेवुन त्यांना निविदा प्रक्रियेत जास्तीत जास्त सहभाग घेण्याचे आवाहन केले आहे. तसेच कार्यारंभ आदेश निर्गमित झालेल्या कामांना जलद गतीने काम पुर्ण करणेबाबत आदेशित केलेले आहे. सद्य:स्थितीत, सर्व योजनांच्या निविदा प्रक्रियेस कंत्राटदार सहभाग मिळालेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जत (जि.सांगली) तालुक्यातील मुख्य ग्रामसडक योजनेतील कामांची गुणवत्ता तपासणी करण्याबाबत**

**(१९) * ६३८१६ श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जत (जि.सांगली) तालुक्यातील मुख्य ग्रामसडक योजनेतील कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत गुणवत्ता तपासणी करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २९ एप्रिल, २०२२ व दिनांक २८ सप्टेंबर, २०२२ रोजी कार्यकारी अभियता, सांगली, मुख्य अभियंता, पुणे व अधिक्षक अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, पुणे विभाग पुणे यांना केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा गुणवत्ता तपासणी अहवाल कार्यकारी अभियंता यांचेकडून वेळेत देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामाची थर्ड पार्टी गुणवत्ता तपासणी न होता देयके अदा करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करुन संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) खरे नाही.

-----------------

**दिव्यांगासाठी राखीव असलेला निधी खर्च न केल्याबाबत**

**(२०) * ५८४९६ श्री.अनिल पाटील (अमळनेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंधराव्या वित्त आयोगातून ग्रामपंचायतीला मिळणाऱ्या निधीपैकी अपंगांसाठी राखीव असलेला निधी खर्च न केल्यामुळे चहार्डी (जि.जळगाव) येथील दिव्यांग व्यक्तीने ग्रामसचिवालयावरून उडी मारून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ग्रामपंचायत क्षेत्रातील ६० दिव्यांग व्यक्तींना आतापर्यंत कोणतीही मदत न करता निधी इतरत्र खर्च करण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जळगाव जिल्ह्यातील बहुतांश ग्रामपंचायत मध्ये अपंगांसाठी राखीव असलेला निधी खर्च करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दिव्यांग व्यक्तींच्या मदतीकरीता प्राप्त झालेला निधीचा योग्य पध्दतीने वापर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) ग्राम विकास विभाग, शासन निर्णय दि.२५/८/२०१८ अन्वये जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायती यांनी त्यांच्या स्वत:च्या उत्पन्नातून दिव्यांगांसाठी ५% निधी राखून ठेवणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने मौजे चहार्डी, जि.जळगाव ग्रामपंचायतीकडून दिव्यांगांसाठी ग्रामनिधीमधून रु.२२,४२०/- इतका खर्च करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील सुशिक्षित बेरोजगार अभियंता, मजूर सहकारी संस्था आणि नोंदणीकृत कंत्राटदार यांना कामाचे समान वाटप होण्याबाबत**

**(२१) * ६२४९८ कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या सर्व विभागात निविदा प्रक्रियेतून कामे देताना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णयानुसार सुशिक्षित बेरोजगार, मजूर सहकारी संस्था आणि नोंदणीकृत कंत्राटदार यांना प्रत्येकी ३३% प्रमाणे कामाचे वाटप होणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये याचा अवलंब न केल्यामुळे सुशिक्षित बेरोजगार अभियंता, मजूर सहकारी संस्था आणि नोंदणीकृत कंत्राटदार यांच्यावर अन्याय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णयाप्रमाणेच सुशिक्षित बेरोजगार अभियंता, मजूर सहकारी संस्था आणि नोंदणीकृत कंत्राटदार यांना प्रत्येकी ३३ % प्रमाणे कामाचे वाटप होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

या विभागाच्या दि.०८ मे, २००७ च्या शासन निर्णयानुसार मजूर सहकारी संस्था, सुशिक्षित बेरोजगार अभियंता आणि सामान्य कंत्राटदार यांना ३३:३३:३४ या प्रमाणात कामाचे वाटप जिल्हा परिषद स्तरावरून करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाशिक जिल्ह्यातील जलजीवन मिशन योजना अंतर्गत प्रलंबित कामे सुरु करणेबाबत**

**(२२) * ६३९४३ श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने कार्यारंभ आदेश दिलेल्या १२८२ योजनांच्या कामांपैकी १८५ योजनांची कामे अद्याप संबंधित मक्तेदार एजन्सीकडून सुरु करण्यात आली नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलजीवन मिशन योजना अंतर्गत सर्वांना नळाने पाणी पुरवठा उपलब्ध करुन देण्याची योजना माहे मार्च, २०२४ पर्यंत पूर्ण करण्याची मुदत असतांना देखील अद्याप १८५ योजनांची कामे सुरुच झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कळवण-सुरगाणा या आदिवासी तालुक्यात संबंधित मक्तेदार एजन्सीकडून निकृष्ट स्वरुपाची कामे सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार उक्त योजनेची कामे सुरु न करणाऱ्या तसेच निकृष्ट कामे करणाऱ्या मक्तेदारांविरुध्द तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

जल जीवन मिशन कार्यक्रम अंतर्गत नाशिक जिल्ह्यात एकुण १२८२ योजनांना कार्यादेश देण्यात आले असून, १८५ योजनांचे कार्यादेश हे नुकतेच जानेवारी-२०२३ ते फेब्रुवारी-२०२३ दरम्यान देण्यात आलेले आहेत. सद्य:स्थितीत, १८५ योजनांपैकी काही अपवादात्मक ५० योजनांचे जागेचे अडचणी अभावी कामे सुरु झालेली नाहीत.
(२) जिल्हा परिषद स्तरावर नियमित अभियंता व मक्तेदर यांची आढावा बैठक घेऊन सर्व कामे मार्च-२०२४ पर्यंत पुर्ण करणेबाबत संबंधितांना निर्देश देऊन नियोजन करण्यात आलेले आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अतिरिक्त रक्त युनिट संकलित केलेल्या रक्तपेढयांवर कारवाई करणेबाबत

**(२३) * ५९३७८ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या माध्यमातून रक्तपेढयांनी गरजे इतके रक्त संकलित करावे असे स्पष्ट निर्देश असताना सातारा येथील सिध्देश्वर, डीजी गोयंका व अन्य दोन रक्त पेढयांनी ६८१ युनिट अतिरीक्त रक्त संकलन केले असल्याचे दिनांक २० जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या निर्दशनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संकलीत झालेले रक्त युनिट हे ३० ते ३५ दिवसात उपयोगात न आणल्यास वाया जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अतिरिक्त युनिट रक्त संकलित करणाऱ्या रक्त पेढयांवर राज्य रक्त संक्रमण परिषदेने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्यांची कारणे कोणती आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.

तथापि, ६८१ युनिट अतिरिक्त रक्तापैकी ५५१ युनिट इतर रक्त केंद्रांना स्थलांतरीत करण्यात आले. तसेच १०० युनिट रक्त हे रक्त साठवणूक केंद्रांना देण्यात आले व फक्त ३० युनिट रक्त वाया गेले आहे.
(३) व (४) रक्त केंद्रांना गरजेप्रमाणे रक्त संकलन करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. तसेच राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषद, नवी दिल्ली यांच्या सुचनेनुसार अतिरिक्त रक्त उपलब्ध असल्यास एका रक्त केंद्रातून दुसऱ्या गरजु रक्त केंद्रास स्थलांतरीत करण्यात येते. तथापि, रक्त केंद्रांना रक्ताची तंतोतंत गरज / मागणी याचा अंदाज बांधता येत नाही. तसेच कुठलीही आपत्ती / आणीबाणी जसे की, मोठा अपघात, नैसर्गिक / मानव निर्मित आपत्ती सांगून येत नाही. त्यामुळे निकडीच्या प्रसंगी रुग्णांचे प्राण वाचविण्याच्या दृष्टीने सर्व रक्त गटाचे रक्त प्रत्येक वेळी उपलब्ध ठेवणे रक्त केंद्राला गरजेचे असते. प्रसंगी अल्प प्रमाणात रक्त वाया गेले तरी चालेल पण रक्ताअभावी गरजु रुग्णांचे प्राण जाऊ नये, हे तत्व रक्त केंद्रांमध्ये अवलंबिले जाते.

----------------

## राज्यात प्रधानमंत्री जनआरोग्य योजने सोबत आयुष्यमान भारत योजनांतील जाचक अटी कमी करण्याबाबत

**(२४) *६४१०५ श्री. सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री. सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत आतापर्यंत २.५३ कोटी गरीब लाभार्थ्यांपैकी केवळ ३४ टक्के लोकांनाच कार्डचे वाटप झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कार्ड वाटपाचे काम अत्यंत संथ गतीने सुरु असल्याने गंभीर आजाराच्या रुग्णांना वेळेत उपचार मिळत नसून ऐनवेळी त्यांना खाजगी रुग्णालयात स्वखर्चाने उपचार घ्यावे लागतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरी व ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील अनेक कुटुंबे या योजनेसाठी पात्र असतानाही योजनेतील अनेक जाचक अटींमुळे राज्यातील सुमारे ६.२५ लाख अर्ज फेटाळण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आपले सरकार सेवा केंद्रावर या कार्डचा लाभ घेण्यासाठी जाणा-या नागरिकांना योजनेसंदर्भात अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असून योजनेच्या लाभापासून नागरिक वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यात प्रधानमंत्री जनआरोग्य योजना तसेच आयुष्यमान भारत योजनांतील जाचक अटी कमी करुन रु.७ लाखाच्या आतील उत्पन्न असलेल्या सर्व नागरिकांना या योजनेचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) असल्यास, या संदर्भात केंद्र शासनाकडे पाठपुरावा करणेबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यामध्ये आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजने अंतर्गत पात्र लाभार्थ्यांपैकी अतिरिक्त माहिती संकलन मोहीमेद्वारे ओळख पटलेल्या एकुण २.५३ कोटी लाभार्थ्यांपैकी दिनांक ०४ मार्च २०२३ अखेर पर्यंत ९१.०८ लक्ष लाभार्थ्यांना आयुष्मान कार्ड (इ-कार्ड) चे वाटप करण्यात आले आहे. कार्ड वाटपाचे हे प्रमाण ३६ टक्के इतके आहे.

(२) हे खरे नाही.

योजनेच्या पात्र लाभार्थ्यांना आयुष्मान कार्डांचे वाटप लवकरात लवकर व्हावे याकरिता राज्यात विशेष मोहिम राबविली जात आहे.

सामाजिक, आर्थिक व जातनिहाय जनगणनेच्या (२०११) यादीत लाभार्थ्यांचे नाव असल्यास आधार कार्ड व कुटुंबाचे दस्तऐवज द्वारे इ-केवायसी करुन योजने अंतर्गत अंगीकृत १००० खाजगी व सरकारी रुग्णालयांमधून तसेच अंगीकृत एजन्सीज आपले सरकार सेवा केंद्र, कलर प्लास्ट झेफायर, युटीआय, आयटीएसएल यांच्यामार्फत आयुष्मान कार्ड काढून देण्याची सुविधा उपलब्ध आहे. उक्त योजनेंतर्गत रुग्णांना वेळेत उपचार मिळत नसल्याची बाब खरी नाही.

(३) हे अंशत: खरे आहे.

सामाजिक, आर्थिक व जातनिहाय जनगणना २०११ (SECC) नुसार ग्रामीण भागातील वंचितता व शहरी भागातील व्यावसायिकता निकषांमध्ये पात्र कुटुंबे आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेमध्ये लाभार्थी म्हणुन समाविष्ट करण्यात आली आहेत. योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्याकडे कुटुंबाचे रेशन कार्ड/प्रधानमंत्री

महोदयांचे पत्र (PM Letter) तसेच आधार कार्ड असणे आवश्यक आहे.

राज्यातील पात्र लाभार्थ्यांपैकी दिनांक ०४ मार्च २०२३ अखेर एकुण ९१,०८,७८९ इतक्या लाभार्थ्यांची यशस्वी पडताळणी करुन त्यांना आयुष्मान कार्ड (ई-कार्ड) चे वितरण करण्यात आले आहे तर ज्या लाभार्थ्यांनी कार्ड मिळण्यासाठी आवश्यक अटींचे निकष पूर्ण केले नाहीत, अशा एकुण ७,००,५९२ इतक्या लाभार्थ्यांचे अर्ज नामंजूर करण्यात आले आहेत.

(४) हे खरे नाही.

(५) आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजने अंतर्गत पात्र लाभार्थी कुटुंबे सामाजिक, आर्थिक व जातनिहाय जनगणना २०११ (SECC) नुसार ग्रामीण व नागरी भागांकरीता अनुक्रमे वंचितता आणि व्यवसाय या निकषांवर आधारीत केंद्र शासनाकडून समाविष्ट केली आहेत. सदर निकष हे व्यक्तीच्या/कुटुंबाच्या उत्पन्नावर आधारीत नाहीत. राज्य शासन स्तरावर याबाबत अधिकार नाहीत.

(६) आयुष्मान भारत प्रधान मंत्री जन आरोग्य योजनेचे लाभार्थी सामाजिक, आर्थिक व जातनिहाय जनगणना २०११ (SECC) नुसार राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरण, दिल्ली यांचेकडून निश्चित करण्यात आले आहेत. त्यानुसार शहरी भागातील कचरा वेचक, भिक्षुक, घरगुती कामगार, गटई कामगार, मोची, फेरीवाले, प्लंबर, सफाई कामगार, माळी इ. प्रकारच्या व्यावसायिक निकषांवर लाभार्थ्यांचा समावेश आहे. तर ग्रामीण भागामध्ये एकुण ७ वंचितता निकषांच्या आधारे लाभार्थी निश्चित करण्यात आले आहेत. यामध्ये कच्च्या भिंती व कच्च्या छताच्या एका खोलीत राहणारे कुटुंब, प्रौढ सदस्य नसलेली कुटुंबे, दिव्यांग कुटुंब प्रमुख कुटुंबे, अनुसूचित जाती व जमाती मधील कुटुंबे, भूमिहीन मजुरांची कुटुंबे इत्यादी प्रकारच्या लाभार्थ्यांचा समावेश करण्यात आला आहे. सदर मुळ निकष हे व्यक्तीच्या/कुटुंबाच्या उत्पन्नावर आधारीत नाहीत. त्यामुळे केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.